
वयोवृद्धः मनोयुवा

# महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉम), मुंबई

संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी क्रमांक : बी.ओ.एम./८४३/८/जीबीबीएसडी दि. २६/११/१९८१

मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नियम १९५० अन्वये नोंदणी क्रमांक : एफ-७५२८ (मुंबई) दि. २५/४/१९८२

कार्यालय पत्ता : ज्येष्ठ नागरिक भवन, सेक्टर १२, प्लॉट नं. ७ सी, गावदेवी मंदिरामागे, नेरूळ (प.), नवी मुंबई - ४०० ७०६.



# फेस्कॉमचे मुखपत्र : मनोहारी मनोयुवा

कार्यालय : अ/७, मिरज-मालगांव रस्ता, सुभाषनगर, ता. मिरज, जि. सांगली - ४१६ ४३७.

वर्ष-३२ | अंक-१ | किंमत : रु. ३०/- | जानेवारी २०२४

## महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉम) - १४ प्रादेशिक विभाग





## सर्व नागरिकांना भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!

सर्व ज्येष्ठ नागरिकांना नवीन वर्षाच्या आरोग्यदायी शुभेच्छा..!

# श्री. सुधीर नाईक (मिरज)

(मोबा. ९८२२४१३४६८)




अखिल भारतीय
ज्येष्ठ नागरिक संघ
**पालक**

माया केअर फाऊंडेशन
**स्वयंसेवक**





कॉमनवेल्थ व्होकेशनल युनिव्हर्सिटी टोंगा, ऑस्ट्रेलिया या विद्यापीठाचे वतीने प्राप्त मानद डॉक्टरेट पदवीसह फेस्कॉम उपाध्यक्ष आण्णासाहेब टेकाळे.



सावित्रीबाई फूले, पुणे विद्यापीठातील सभेप्रसंगी मा.कुलगुरू यांना फेस्कॉम महासंघाची पुस्तके भेट देतांना फेस्कॉम अध्यक्ष अरूण रोडे.




माजी सैनिकांच्या कल्याणासाठी ध्वजनिधी र.रू.३५००/- सांगली जि.प.च्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौ.तृप्ती धोडमिसे यांना सुपूर्द करतांना अंजुमन खान, उपाध्यक्ष काशिनाथ काळे, सचिव आनंदराव अमृतसागर

# Federation of Senior Citizen Organisation, Maharashtra (FESCOM)

## महासंघाचे (फेस्कॉम) दृष्टीपथ व्हिजन : पूर्ण होऊ शकणारे स्वप्न

- निस्वार्थ सेवा कार्याची आदर्श असलेली महाराष्ट्रातील ज्येष्ठांचे हक्क व समस्यांबाबत जागृत व अग्रणी असणारी प्रमुख समाजसेवी संघटना.
- महाराष्ट्रातील सर्व ज्येष्ठ नागरिकांचा कैवारी म्हणून कार्य करणारा हा महासंघ समाजोपयोगी कार्यात व उपक्रमात अग्रेसर व्हावा.
- महाराष्ट्रातील शहरांच्या प्रत्येक उपनगरांत, निमशहरी भागांत व गावोगावी ज्येष्ठ नागरिक संघ असावे व ते सर्व महासंघाशी संलग्न असावे आणि महासंघाचे अंगीकृत उद्दिष्टे व नीती राबविणारे असावे.
- महाराष्ट्रातील प्रत्येक शहरात व गावात ज्येष्ठ नागरिक भवन असावे.ते ज्येष्ठांचे नुसते विरंगुळा केंद्र न राहता समाज मंदिराच्या रूपाने जातीय सलोखा, एकजूट, राष्ट्रीय एकात्मता वाढविणारे केंद्र असावे.
- ज्येष्ठांचे विविध प्रश्न सन्मानाने सोडविण्यासाठी महासंघाच्या मुख्य पदाधिकाऱ्यांना लोकप्रतिनिधीचा दर्जा असावा व तो शासनाने मान्य करावा.
- महासंघामध्ये प्रत्येक समाजाभिमुख क्षेत्रातील तज्ञ मंडळी असावी. महासंघाच्या झेंड्याखाली त्यांचा उपयोग समाजास व्हावा.
- महासंघाच्या या अनुभवी तज्ञ मंडळी द्वारे शासनाला आणि अन्य संस्थांना विशेष अनुभवी सल्ला मिळु शकण्याची सोय व्हावी.
- महासंघ ही संघटना ग्रामीण क्षेत्राचा उत्कर्ष करणारी, ग्रामीण समस्या सोडविणारी, तसेच आदिवासी क्षेत्रात व तळागाळातील वृध्दांचे जीवन सुसह्य करणारी असावी.
- महासंघ महिलांचे, विशेषतः निराधार व विधवांचे सामाजिक व आर्थिक प्रश्न सोडवणारी एक प्रभावी माध्यम अशी संस्था असावी आणि महिलांना राष्ट्रीय प्रवाहात मानाचे स्थान मिळवून देणारी संघटना असावी.
- महासंघाच्या कार्यालयांत अदयावत सोयी, सुविधा व साधन सामुग्री असावी.

### २.महासंघाचे (फेस्कॉम) अंगीकृत उद्दिष्ट

महाराष्ट्रातील ज्येष्ठ नागरिकांच्या आणि त्यांच्या संघाच्या समग्र कल्याणकारी उपक्रमाचे एका नेतृत्वाखाली एकीकरण व सुदृढीकरण करणे आणि ज्येष्ठांचे बहुमोल ज्ञान, प्रगाढ अनुभव, प्रगल्भता. चैतन्य आणि कौशल्य यांचा एकूण समाजाच्या आणि विशेषत्वाने ज्येष्ठ नागरिकांच्या कल्याणासाठी उपयोग करून घेणे.

## हार्दिक अभिनंदन !!!

**फेस्कॉमचे अध्यक्ष अरुण रोडे** यांची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील बहि:शाल शिक्षण मंडळ व ज्येष्ठ नागरिक सहाय्यता कक्षाच्या सल्लागार समितीच्या कार्यकारिणीत सदस्य म्हणून निवड झालेबद्दल हार्दिक अभिनंदन..!

---

**फेस्कॉमचे उपाध्यक्ष आण्णासाहेब टेकाळे** यांची नवी मुंबई महानगरपालिकेच्या ज्येष्ठ नागरिक स्वतंत्र कक्षाच्या कार्यकारिणीत सदस्य म्हणून निवड झालेबद्दल हार्दिक अभिनंदन..!

---

**मा. अरुण रोडे आणि मा. आण्णासाहेब टेकाळे**

यांचे फेस्कॉम आणि फेस्कॉम मनोयुवा कौन्सिलच्या वतीने **हार्दिक अभिनंदन** व भावी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा..!

# अतिशय महत्त्वाचे आवाहन

दि.१ एप्रिल २०२४ पासून फेस्कॉम आणि १४ प्रादेशिक विभागाची निवडणुक प्रक्रिया सुरु होणार आहे. या मतदान प्रक्रियेत मतदार म्हणून पात्र होणेसाठी ज्येष्ठ नागरिक संघांनी १) संघाची २०२३-२०२४ ची वार्षिक वर्गणी, सभासद निहाय, व थकबाकी असलेस, थकबाकीसह दि.३१ मार्च २०२४ अखेर भरणे आवश्यक आहे. आणि २) दि.३१ मार्च २०२४ अखेरपर्यंतची वार्षिक वर्गणी भरलेल्या संघांनी २०२४-२०२५ या वर्षाची वार्षिक वर्गणी दि.३१ मे २०२४ अखेर भरणे आवश्यक आहे. जे ज्येष्ठ नागरिक संघ वरीलप्रमाणे संघाची वर्गणी फेस्कॉम प्रादेशिक विभागाकडे जमा करतील त्यांनाच.....

१) निवडणूक प्रक्रियेत मतदार म्हणून भाग घेता येईल.

२) या संघापैकीच सदस्यास फेस्कॉम अगर प्रादेशिक विभागाच्या निवडणुकीत सदस्य म्हणून उमेदवारी अर्ज भरता येईल.

३) या संघापैकीच सदस्यास जिल्हा/तालुका समन्वय समितीत सदस्य होता येईल.

तरी सर्व ज्येष्ठ नागरिक संघांनी संभाव्य निवडणुक प्रक्रिया सुरळीत पार पडणेसाठी सभासदनिहाय वार्षिक वर्गणी आपापल्या प्रादेशिक विभागाकडे तात्काळ जमा करावी. प्रादेशिक विभागाचे अध्यक्ष आणि जिल्हा/तालुका समन्वय समित्यांचे अध्यक्ष व पदाधिकारी यांना आवाहन करणेत येते की, निवडणुक प्रक्रियेबाबत (माहिती) आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व ज्येष्ठ नागरिक संघांना अवगत करुन त्यांना वार्षिक वर्गणी भरणेबाबत मार्गदर्शन करावे.

फेस्कॉमचे घटनेनुसार वार्षिक वर्गणीचे शुल्क ज्येष्ठ संघाच्या माहितीसाठी देत आहोत.

| दरवर्षी १ एप्रिल रोजीची सभासद संख्या | प्रत्येक संघासाठी | प्रवेश शुल्क | विकास निधी |
|---|---|---|---|
| २५ | १००/- | २००/- | प्रति सभासद रु. ३/- |
| २६-५० | २००/- | २००/- | |
| ५१-१०० | ३००/- | २००/- | |
| १०१-२०० | ४००/- | २००/- | |
| २०१-३०० | ५००/- | २००/- | |
| ३०१-५०० | ६००/- | २००/- | |
| ५०० पेक्षा जास्त | १०००/- | २००/- | |

टिप :- १) विकास निधीपैकी प्रती सभासद रु.१/- प्रमाणे त्याचवेळी संबंधी संघाच्या विकासासाठी संघाला परत दिला जातो.

२) प्रवेश शुल्क फेस्कॉममध्ये प्रथम प्रवेश घेतानाच भरणेचा असतो. (फक्त नविन संघानीच भरणेचा)

**अंजुमन खान**
फेस्कॉम उपाध्यक्ष व प्रमुख
मनोयुवा कौन्सिल

**विवेक देशपांडे**
मुख्य सचिव

**अरुण रोडे**
फेस्कॉम अध्यक्ष

६० वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांना
"ज्येष्ठ नागरिक ओळखपत्र" देण्याबाबत..

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय : - ओएएच - २००१/ प्र. क्र. १४८ / सुधार - १
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४००.०३२.
दिनांक : २४ सप्टेंबर २००१

वाचा : १) शासन निर्णय, गृह विभाग क्रमांक एसटीसी - १९९८ / ६६७ / प्र. क्र. ३६ / परि - १,
दिनांक २५ ऑक्टोबर, २०००
२) शासन पत्र, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक :
ओएएच - २००१ / प्र. क्र. १४८ / सुधार - १, दिनांक ३० मे, २००१

प्रस्तावना : ज्येष्ठ नागरिकांना केंद्र शासन, राज्य शासन, रेल्वे विमानसेवा, बँको, इत्यादींकडून विविध प्रकारच्या सवलती जाहिर करण्यात आलेल्या आहेत. वरील क्रमांक १ येथील शासन निर्णयानुसार ६५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांना महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळाच्या साध्या बस मधून प्रवास करण्यासाठी प्रवास भत्त्यात दिलेल्या सवलतीचा लाभ घेण्यासाठी भारतीय निवडणूक आयोगाने दिलेले ओळखपत्र व ते नसल्यास संबंधित तालुक्याच्या तहसिलदाराने दिलेले ओळखपत्र ग्राह्य धरण्यात येते. क्रमांक २ येथील शासन पत्रान्वये निवडणूक आयोगाने दिलेले ओळखपत्र ज्येष्ठ नागरिकांना मिळणाऱ्या सर्व सवलतींसाठी ग्राह्य धरण्यात यावे, अशा सूचना सर्व शासकीय विभागांना देण्यात आलेल्या आहेत. या पद्धती यापुढेही सुरु राहणार आहेत. तथापि, दुरध्वनी क्रमांक, रक्तगट, अचानक उद्भवलेल्या प्रसंगी कोणाशी संपर्क साधण्यात यावा, त्या व्यक्तीचे नांव, पत्ता व दुरध्वनी क्रमांक, ज्येष्ठ नागरिकांस आजार असल्यास त्याचा उल्लेखन, ते घेत असलेले वैद्यकीय उपचार, अशा प्रकारची अधिकची माहिती असलेले एक ओळखपत्र वैकल्पिक (Optional) धर्तीवर देण्याचा प्रस्ताव विचाराधीन होता. ज्येष्ठ नागरिकांकडून अर्ज गोळा करण्यापासून अशा प्रकारचे ओळखपत्र ज्येष्ठ नागरिकांना घरपोच वाटप करण्याच्या प्रक्रीयेमुळे तहसिलदार कार्यालयांवर कामाचा अधिक भार पडू नये, यास्तव सदरचे ओळखपत्र हे ज्येष्ठ नागरिकांसाठी कार्य करणाऱ्या एखाद्या स्वयंसेवी संस्थेमार्फत तहसिलदारांच्या सही व शिक्क्यानिशी ६० वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांना देण्यात यावे, असाही प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्या अनुषंगाने, जिल्हाधिकारी, मुंबई शहर जिल्हा, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी कार्य करणाऱ्या डिग्निटी फाऊंडेशन, फेस्कॉम (Federation of Senior Citizens' Organisation Maharashtra), जनजागृती मंच यासारख्या स्वयंसेवी संस्थांचे पदाधिकारी यांच्या वेळोवेळी बैठका घेऊन व सांगोपांग चर्चा करून वर नमूद केल्याप्रमाणे ज्येष्ठ नागरिक ओळखपत्र हे सध्या प्रायोगिक तत्वावर प्रथमतः मुंबईमध्ये देण्यात यावे, याबाबतही विचार करण्यात आला.

शासन निर्णय : वरील प्रस्तावाच्या अनुषंगाने खालील निर्णय घेण्यात आलेले आहे.

१) वर नमूद केल्यानुसार द्यावयाचे ओळखपत्र वैकल्पिक (Optional) स्वरुपाचे राहिल. म्हणजे जे ज्येष्ठ नागरिक हे ओळखपत्र घेऊ इच्छित असतील त्यांना ते घेता येईल.

२) सदर ओळखपत्र हे सर्वसाधारणपणे निवडणूक आयोगाने दिलेल्या ओळखपत्राच्या आकाराचे व लॅमिनेट केलेले असेल. ओळखपत्रामध्ये ज्येष्ठ नागरिकांचे नांव, जन्मतारीख, पत्ता, दूरध्वनी क्रमांक, रक्तगट, अचान उद्भवलेल्या प्रसंगी कोणाशी संपर्क साधण्यात यावा, त्या व्यक्तीचे नांव, पत्ता व दूरध्वनी क्रमांक, आजार असल्यास त्यांचा उल्लेख, घेत असलेले वैद्यकीय उपचार अशा तपशिलाचा समावेश असावा.

३) तपशिल इंग्रजी व मराठीमध्ये असावा.

४) ओळखपत्र रंगीत व एकाच रंगाचे असावे व त्याचा रंग असा असावा की त्यावरील तपशिल स्पष्टपणे वाचनीय असेल.

५) ज्येष्ठ नागरिकांसाठी जाहिर करण्यात आलेल्या सवलतींचा लाभ घेण्यासाठी हे ओळखपत्र ग्राह्य धरण्यात येईल.

६) सुरुवातीला अशा प्रकारची ओळखपत्रे ही प्रायोगिक तत्वावर प्रथमतः मुंबईमध्ये देण्यात यावीत व त्याचा अनुभव लक्षात घेऊन नंतर इतरत्र देण्याबाबतचा विचार करण्यात येईल.

७) स्वयंसेवी संस्था ज्येष्ठ नागरिकांकडून विहित नमुन्यामध्ये २ प्रतींमध्ये अर्ज गोळा करील. अर्जासोबत नजिकच्या काळातील ३ रंगीत फोटो, अर्जात नमूद केलेल्या तपशिलाच्या पुराव्या दाखल आवश्यक ती प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक राहिल. जन्मतारखेच्या पुराव्यासाठी शाळा सोडल्याचा दाखला, जन्माचा दाखला व असा दाखला नसल्यास शल्यचिकित्सकाचा वैद्यकीय दाखला, रक्तगटाबाबतचा वैद्यकीय दाखला, रेशनकार्डची झेरॉक्स प्रत जोडणे आवश्यक आहे. अशाप्रकारे अर्जातील

तपशिल तसेच फोटोची पडताळणी करून अर्ज त्याप्रमाणे
तपशिलाच्या पुराव्या दाखल सादर केलेल्या कागदपत्रांनुसार तपशिल तसेच फोटोची पडताळणी करून अर्ज त्याप्रमाणे
संस्थेकडून अर्जावरील विहित पृष्ठांकनाद्वारा प्रमाणित करण्यात येईल. त्या बरोबरच ओळखपत्रावर अनुक्रमांक देऊन
आवश्यक तो तपशिल संगणकीकृत केला जाईल व त्यावर एक फोटो चिटकवला जाईल. त्यानंतर २ प्रतीमध्ये अर्ज व
ओळखपत्रे संबंधित संस्थेकडून दर आठवड्यास संबंधित तहसिलदाराककडे हस्तबटवड्यांने (पोष्टाने नव्हे) पाठविले
जातील. तहसिलदार कार्यालयाकडून त्या अर्जाची पोच दिली जाईल. त्यानंतर संबंधित तहसिलदार संस्थेच्या प्रमाणपत्राच्या
अनुषंगाने व अर्जाची पोच दिली जाईल. त्यानंतर संबंधित तहसिलदार संस्थेच्या प्रमाणपत्राच्या अनुषंगाने व अर्जदाराने
पुराव्यादाखल सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे तपासणी केल्यानंतरच ओळखपत्राच्या कार्डावर सही करुन तसेच त्यांचे
सील मारुन व अर्जाची एक प्रत तहसिलदार कार्यालयात ठेऊन घेऊन ओळखपत्र व अर्जाची एक प्रत संस्थेच्या व्यक्तीकडे परत
करुन त्याची पोच घेतील. त्यानंतर सदर ओळखपत्र संस्थेकडून लॅमिनेट करुन घेतले जाईल व संबंधित ज्येष्ठ नागरिकांना
त्याची पोच घेऊन तसेच निर्धारित किंमत प्राप्त करुन घेऊन संस्थेकडून ज्येष्ठ नागरिकांना घरपोच दिली जातील.

८) वर नमूद केल्याप्रमाणे ज्येष्ठ नागरिकांकडून अर्ज प्राप्त करुन घेण्यापासून ते त्यांना लॅमिनेटेड ओळखपत्र देण्यापर्यंतची सर्व प्रक्रिया ही डिग्निटी फाऊंडेशन, मुंबई या संस्थेमार्फत करण्यात येईल आणि फेस्कॉम, मुंबई व जनजागृती संघ, मुंबई या संस्था त्यांना या कामात मदत करतील. या ओळखपत्रासाठी संस्थेला येणाऱ्या सर्व खर्चासाठी ओळखपत्राची किंमत प्रत्येकी रू. २०/- पर्यंत ठेवण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(वै. अ. पारकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

---

६० वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांना
"ज्येष्ठ नागरिक ओळखपत्र" देण्याबाबत..

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक - ओएएच २००२ / प्रक्र - ११२ / सुधार - १
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ६ मे, २००३

वाचा : १) शासन निर्णय सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग
क्रमांक - ओएएच २०००/प्रक्र - १४८/सुधार - १, दिनांक २४ सप्टेंबर, २००१
२) शासन निर्णय सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग
क्रमांक ओएएच २००१ / प्रक्र - १४८ - अ/सुधार - १, दिनांक ४ मार्च, २००२
३) अध्यक्षा, डिग्नीटी फाऊंडेशन यांचे दिनांक १ एप्रिल, २००२ चे पत्र
४) अध्यक्ष, महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉम), मुंबई यांचे दिनांक १९ जून २००२ चे पत्र.

**प्रस्तावना :** राज्यातील ज्येष्ठ नागरिकांना 'ज्येष्ठ नागरिक ओळखपत्र' प्रथमतः मुंबई शहरासाठी प्रायोगिक तत्वावर
देण्याबाबतचा निर्णय दिनांक २४ सप्टेंबर, २००१ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला आहे. हे ओळखपत्र वैकल्पिक
(ऐच्छिक) स्वरुपाचे आहे. ज्येष्ठ नागरिकांकडून अर्ज प्राप्त करुन घेण्यापासून ते लॅमिनेट ओळखपत्र घरपोच देण्यापर्यंतची सर्व
प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी दिनांक ४ मार्च २००२ च्या शासन निर्णयानुसार डिग्नीटी फाऊंडेशन, मुंबई व महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक
महासंघ (फेस्कॉम), मुंबई या संस्थांना शासनाने मान्यता दिली असून ओळखपत्रासाठी संस्थेला येणाऱ्या सर्व खर्चासाठी
ओळखपत्राची किंमत प्रत्येकी रुपये ३०/- पर्यंत ठेवण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. सदरहू संस्थांनी आता संपूर्ण
राज्यभरातील ज्येष्ठ नागरिकांना ज्येष्ठ नागरिक ओळखपत्र देणेबाबत संदर्भाधीन क्रमांक ३ व ४ येथील पत्रान्वये परवानगी
मागीतली आहे. सदर योजना राज्यभर राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

या आदेशान्वये राज्यातील ज्येष्ठ नागरिकांना ओळखपत्र तयार करून देणेबाबत डिग्नीटी फाऊंडेशन व महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉम), मुंबई या संस्थांना प्राधिकृत करण्यात येत आहे. तसेच त्यांचेमार्फत तयार करण्यात येणाऱ्या ओळखपत्रावर एकाच प्रकारचा हॉलोग्राम असावा. यासाठी दोन्ही संस्थांनी एकच हॉलोग्राम निश्चित करुन घ्यावा. ओळखपत्राचे

स्वरुप व ते देण्याबाबतची कार्यपद्धती पुढीलप्रमाणे राहील.

(१) ओळखपत्र वैकल्पिक (Optional) स्वरुपाचे राहील, म्हणजे जे ज्येष्ठ नागरिक हे ओळखपत्र घेऊ इच्छित असतील त्यांना ते घेता येईल.

(२) सदर ओळखपत्र हे सर्वसाधारणपणे निवडणुक आयोगाने दिलेल्या ओळखपत्राच्या आकाराचे व लॅमिनेट केलेले असेल. ओळखपत्रामध्ये ज्येष्ठ नागरिकांचे नांव, जन्मतारीख, पत्ता, दूरध्वनी क्रमांक, रक्तगट, अचानक उदभवलेल्या प्रसंगी कोणाशी संपर्क साधण्यात यावा, त्या व्यक्तीचे नांव, पत्ता व दूरध्वनी क्रमांक, आजार असल्यास त्याचा उल्लेख, घेत असलेले वैद्यकीय उपचार अशा तपशीलाचा समावेश असावा.

(३) तपशील इंग्रजी व मराठीमध्ये असावा.

(४) ओळखपत्र रंगीत व एकाच रंगाचे असावे व त्याचा रंग असा असावा की त्यावरील तपशील स्पष्टपणे वाचनीय असेल.

(५) ज्येष्ठ नागरिकांसाठी जाहिर करण्यात आलेल्या सवलतींचाच लाभ घेण्यासाठी ओळखपत्र ग्राह्य धरण्यात येईल.

(६) स्वयंसेवी संस्था ज्येष्ठ नागरिकांकडून विहित नमुन्यामध्ये २ प्रतीमध्ये अर्ज गोळा करील. अर्जासोबत नजिकच्या काळातील ३ रंगीत फोटो, अर्जात नमूद केलेल्या तपशीलाच्या पुराव्यादाखल आवश्यक ती प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक राहिला. जन्मतारखेच्या पुराव्यासाठी शाळा सोडल्याचा दाखला, जन्माचा दाखला व असा दाखला नसल्यास शल्यचिकित्सकाचा वैद्यकीय दाखला, रक्तगटाबाबतचा वैद्यकीय दाखला, रेशनकार्डची झेरॉक्स प्रत जोडणे आवश्यक आहे. अशाप्रकारे अर्जातील तपशीलाच्या पुराव्या दाखल सादर केलेल्या कागदपत्रांनुसार तपशील तसेच फोटोची पडताळणी करुन कर्ज त्याप्रमाणे संस्थेकडून अर्जावरील विहित पृष्ठांकनाद्वारे प्रमाणित करण्यात येईल. त्या बरोबरच ओळखपत्रावर अनुक्रमांक देऊन आवश्यक तो तपशील संगणकीकृत केला जाईल व त्यावर एक फोटो चिकटवला जाईल. त्यानंतर २ प्रतींमध्ये अर्ज व ओळखपत्रे संबंधित संस्थेकडून दर आठवड्यास संबंधित तहसिलदाराकडे हस्तबटवड्याने (पोष्टाने नव्हे) पाठविले जातील. तहसिलदार कार्यालयाकडून त्या अर्जाची पोच दिली जाईल. त्यानंतर संबंधित तहसिलदार संस्थेच्या प्रमाणपत्राच्या अनुषंगाने व अर्जदाराने पुराव्यादाखल सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे तपासणी केल्यानंतरच ओळखपत्राच्या कार्डावर सही करुन तसेच त्यांचे सील मारुन व अर्जाची एक प्रत तहसिलदार कार्यालयात ठेऊन घेऊन ओळखपत्र व अर्जाची एक प्रत संस्थेच्या व्यक्तीकडे परत करुन त्याची पोच घेतील. त्यानंतर सदर ओळखपत्र संस्थेकडून लॅमिनेट करुन घेतले जाईल व संबंधित ज्येष्ठ नागरिकांना त्याची पोच घेऊन तसेच निर्धारित किंमत प्राप्त करुन घेऊन संस्थेकडून ज्येष्ठ नागरिकांना घरपोच दिली जातील.

(७) वर नमूद केल्याप्रमाणे ज्येष्ठ नागरिकांकडून अर्ज प्राप्त करून घेण्यापासून ते त्यांना लॅमिनेटेड ओळखपत्र देण्यापर्यंतची सर्व प्रक्रिया ही महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉम), मुंबई आणि डिग्निटी फाऊंडेशन, मुंबई या संस्थांमार्फत करण्यात येईल. या ओळखपत्रासाठी संस्थेला येणाऱ्या सर्व खर्चासाठी ओळखपत्राची किंमत प्रत्येकी रुपये ३०/- पर्यंत ठेवण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(ना. ना. भडीकर)

उप-सचिव, महाराष्ट्र शासन

जेष्ठ नागरीकांसाठी दिवसभराच्या काळात देखभाल व विरंगुळा केंद्र स्थापन करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
शासन परिपत्रक क्र.संकिर्ण-२००७/प्र.क्र.१३३ /पंरा-७
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
दिनांक- १४ मे, २०१०

संदर्भ :- (१) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, पत्र क्र.ओएएच-२००६/ प्र.क्र.१८१/ सुधार-१, दिनांक २२जुलै,२००९
(२) लोकआयुक्त, मुंबई, पत्र क्र.उलोआ/कॉम/५४०८/०८(टे-१७), दि.२५.५.२००९

-: परिपत्रक :-

प्रोजेक्ट युनायटेड कार्यक्रमांतर्गत जेष्ठ नागरीकांसंदर्भात तरतुदींची अंमलबजावणी करण्यासंबधात स्वाधिकाराने सुरु केलेल्या चौकशीमध्ये मा.उपलोक आयुक्त यांनी महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त अधिनियम-१९७१ च्या कलम-१२ (१) खाली दिनांक १५.५.२००९ रोजीचा शिफारस अहवाल शासनाकडे पाठविलेला आहे. त्यामध्ये "जेष्ठ नागरीकांना दिवसभराच्या काळात देखभाल व विरंगुळा केंद्र स्थापन करणे गरजेचे आहे. असे केंद्र स्थापन करण्याकरीता शासनाने निकष ठरवावे व प्रत्येक ठिकाणी त्यांना किमान वेळेत सदर केंद्रावर जाता येणे सोयीचे होईल, असे केंद्र स्थापन करावे. त्यात लायब्ररी, मनोरंजन इ.सोयी असाव्यात. सदर केंद्र हे शासन किंवा महापालिका किंवा जिल्हा परिषद यांनी इमारत बांधल्यावर त्या चालविण्याकरीता काही फी चार्ज करता येईल व त्यात दारिद्र्यरेषेखालील किंवा इतरांना सूट देता येईल, असे केंद्र मोठ्या प्रमाणावर बांधण्याची गरज आहे. कारण सर्व स्तरावरील जेष्ठ नागरीकांना त्याची गरज आहे." अशा स्वरुपाची शिफारस मा.उपलोक आयुक्त यांनी केलेली आहे.

३. मा.उपलोक आयुक्त यांच्या सदर शिफारशीच्या अनुषंगाने, सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पंचायत राज संस्थेअंतर्गत त्यांच्या अधिनस्थ जिल्हा परिषद ते ग्रामपंचायत स्तरापर्यंत आढावा घेवून, संबधित महानगरपालिका व नगरपालिकेच्या क्षेत्राबाहेरील जिल्हा परिषदेच्या क्षेत्रात जेष्ठ नागरींकांसाठी दिवसभराच्या काळात देखभाल व विरंगुळा केंद्र स्थापन करण्यासंबधात उचित कार्यवाही करावी. तसेच असे देखभाल व विरंगुळा केंद्र स्थापन केल्यानंतर त्याबाबतचा सविस्तर अहवाल शासनास सादर करावा.

४. या साठी लागणारा खर्च जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्राम पंचायत यांनी स्वनिधी/ स्वउत्पन्नातून करावा.

५. प्रस्तुतचे परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संगणक सांकेतांक क्र.२०१००५१४१३००४५००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(दि. ग. मोरे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

विशेष सहाय्य योजना.

१) संजय गांधी निराधार अनुदान योजना.

२) श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना.

३) इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना.

४) इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना.

५) इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजना.

महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

शासन निर्णय क्रमांक : विसयो-२०१८/प्र.क्र.६२/विसयो

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक: २० ऑगस्ट, २०१९

ा:-

१) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.विसयो-२०१०/प्र.क्र.१७५/विसयो-२, दि. २६ ऑक्टोबर,२०१०.

२) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.विसयो-२०११/प्र.क्र.१२७/विसयो-२, दि. ३१ ऑक्टोबर,२०११.

३) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.विसयो-२०१२/प्र.क्र.१०२/विसयो-२, दि.०२ एप्रिल, २०१२.

४) शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.विसयो-२०११/प्र.क्र.२२६/विसयो-२, दि. १२ जून, २०१३.

५) शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.विसयो-२०१३/प्र.क्र.४६४/विसयो-१, दि. २७ जून, २०१३.

६) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.विसयो-२०१३/प्र.क्र.२०६/विसयो-२, दि.२१ जानेवारी, २०१४.

७) शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.समिती-२०१४/प्र.क्र.१६२/विसयो-२, दि. २७ नोव्हेंबर, २०१४.

८) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.विसयो-२०१५/प्र.क्र.१०५/विसयो-२, दि.०५ मे, २०१५.

९) शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.विसयो-२०१४/प्र.क्र.२६/विसयो-२, दि.२२ जून, २०१५.

१०) शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.विसयो-२०१५/प्र.क्र.९४/विसयो-२, दि.०४ ऑगस्ट, २०१५.

११) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.विसयो-२०१५/प्र.क्र.२८५/विसयो-२, दि.१३ ऑक्टोबर,२०१५.

१२) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.विसयो-२०१५/प्र.क्र.२७५/विसयो-२, दि.०५ जानेवारी, २०१६.

१३) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.विसयो-२०१७/प्र.क्र.२०३/विसयो, दि. ०३ नोव्हेंबर, २०१८.

१४) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.विसयो-२०१६/प्र.क्र.२३२/विसयो, दि.११ जून, २०१९.

**प्रस्तावना:-**

राज्यात निराधार, अंध, अपंग, शारिरीक आजाराने रोगग्रस्त व्यक्ती व निराधार विधवा, परित्यक्त्या, देवदासी या सर्व दुर्बल घटकांसाठी अर्थसहाय्य देण्याच्या हेतूने राज्य पुरस्कृत संजय गांधी निराधार अनुदान योजना व वृध्द व्यक्तींसाठी श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना राबविण्यात येतात. तसेच केंद्र पुरस्कृत दारिद्र्य रेषेखालील वृध्द व्यक्तींकरीता इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना, विधवा महिलांकरीता इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना व दिव्यांग व्यक्तींसाठी इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजना राबविण्यात येतात. संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेंतर्गत मिळणाऱ्या अर्थसहाय्यात वाढ करण्याबाबत मा.लोकप्रतिनिधी, विविध संघटना, स्वयंसेवा संस्था व अनेक नागरिक यांच्या माध्यमातून शासनाकडे वारंवार मागणी व पाठपुरावा करण्यात येत होता. संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेंतर्गत लाभार्थ्यांच्या अर्थसहाय्यात दरमहा रुपये ६००/- वरुन रुपये १०००/- व सदरहू योजनेतील विधवा लाभार्थ्यांना १ अपत्य असल्यास दरमहा रुपये ११०० व २ अपत्य असल्यास रुपये १२०० इतके अर्थसहाय्य देण्याबाबत, मा.मंत्री (वित्त) महोदयांनी सन २०१९-२० या वर्षाचा अतिरिक्त अर्थसंकल्पीय भाषणामध्ये घोषणा केली आहे. त्यानुसार सदर योजनेंतर्गत लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या अर्थसहाय्यात वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने दिनांक ०७ ऑगस्ट, २०१९ रोजीच्या मा.मंत्रीमंडळ बैठकीत मान्यता मिळाल्यानुसार खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय:**

विशेष सहाय्य योजना राज्यात राबविण्याबाबत गठीत संजय गांधी निराधार अनुदान समिती, समितीची कार्यकक्षा, योजनेचे निकष, लाभार्थ्यांचा पात्रतेच्या अटी व शर्ती त्याचप्रमाणे अनुदान वाटपाचे करावयाच्या कार्यवाही बाबतचे संदर्भ क्रमांक १ ते १४ येथील शासन निर्णय व परिपत्रके या शासन निर्णयाद्वारे अधिक्रमित करण्यात येत आहेत. तसेच विशेष सहाय्य योजना राज्यात राबविण्याकरीता करावयाच्या कार्यपध्दती/कार्यवाही या शासन निर्णयान्वये पुढीलप्रमाणे विहित करण्यात येत आहेत :-

<u>राज्य पुरस्कृत योजना :-</u>

**(१) संजय गांधी निराधार अनुदान योजना:-**

संजय गांधी निराधार अनुदान योजनेमधून दारिद्रय रेषेखालील यादीच्या कुटूंबात नाव नसलेल्या व रु २१०००/- पेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या पात्र लाभार्थ्यांस मिळणाऱ्या दरमहा रुपये ६००/- अर्थसहाय्यात रुपये ४००/- इतकी वाढ करुन अर्थसहाय्याची रक्कम **दरमहा रुपये १०००/-** अशी करण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे संजय गांधी निराधार अनुदान योजनेतील अपत्य नसलेल्या विधवा लाभार्थ्यांना देण्यात येणा-या दरमहा रुपये ६००/- अर्थसहाय्यात रुपये ४००/- इतकी वाढ करुन अर्थसहाय्याची रक्कम **दरमहा रुपये १०००/-**, १ अपत्य असलेल्या विधवा लाभार्थ्यांना देण्यात येणा-या दरमहा रुपये ६००/- अर्थसहाय्यात रुपयें ५००/- इतकी वाढ करुन अर्थसहाय्याची रक्कम **दरमहा रुपये ११००/-** व २ अपत्य (२ व त्यापेक्षा अधिक अपत्य) असलेल्या विधवा लाभार्थ्यांना मिळणा-या दरमहा रुपये ६००/- अर्थसहाय्यात रुपये ६००/- इतकी वाढ करुन अर्थसहाय्याची रक्कम **दरमहा रुपये १२००/-** अशी करण्यात येत आहे.

दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या यादीत नाव असलेल्या निराधार व्यक्तींना केंद्र शासनाच्या इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजनेमधून रुपये ३००/- निवृत्तीवेतन देण्यात येते. त्याला पूरक असलेल्या राज्य शासनाच्या संजय गांधी निराधार अनुदान योजनेमधून लाभार्थ्यांस देण्यात येणा-या दरमहा रुपये ३००/- अर्थसहाय्यात रुपये ४००/- इतकी वाढ करुन अर्थसहाय्याची रक्कम **दरमहा रुपये १०००/-** (केंद्र शासनाचे रुपये ३००/- व राज्य शासनाचे रुपये ७००/-) अशी करण्यात येत आहे.

तसेच संजय गांधी निराधार अनुदान योजनेतील अपत्य नसलेल्या विधवा लाभार्थ्यांना **दरमहा रुपये १०००/-**(केंद्र शासनाचे रुपये ३००/- व राज्य शासनाचे रुपये ७००/-), १ अपत्य असलेल्या विधवा लाभार्थ्यांना **दरमहा रुपये ११००/-** (केंद्र शासनाचे रुपये ३००/- व राज्य शासनाचे रुपये ८००/-) व २ अपत्य (२ व त्यापेक्षा अधिक अपत्य) असलेल्या विधवा लाभार्थ्यांना **दरमहा रुपये १२००/-** (केंद्र शासनाचे रुपये ३००/- व राज्य शासनाचे रुपये ९००/-) अशी करण्यात येत आहे.

संजय गांधी निराधार अनुदान योजनेमधील लाभार्थी ६५ वर्षाचे झाल्यानंतर त्या लाभार्थ्यांना श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजनेच्या निकषांच्या अधीन राहून लाभ देण्यात यावा.

योजनेच्या अटी व निकष सोबतच्या परिशिष्ट-१ प्रमाणे राहतील.

**(२) श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना:-**

श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेमधून दारिद्रय रेषेखालील यादीच्या कुटूंबात नाव नसलेल्या व रु २१०००/- पेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या पात्र लाभार्थ्यांस देण्यात येणा-या दरमहा रुपये ६००/- अर्थसहाय्यात रुपये ४००/- इतकी वाढ करुन अर्थसहाय्याची रक्कम **दरमहा रुपये १०००/-** अशी करण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेतील अपत्य नसलेल्या विधवा लाभार्थ्यांना देण्यात येणा-या दरमहा रुपये ६००/- अर्थसहाय्यात रुपये ४००/- इतकी वाढ करुन अर्थसहाय्याची रक्कम **दरमहा रुपये १०००/-**, १ अपत्य असलेल्या विधवा लाभार्थ्यांना देण्यात येणा-या दरमहा रुपये ६००/- अर्थसहाय्यात रुपये ५००/- इतकी वाढ करुन अर्थसहाय्याची रक्कम **दरमहा रुपये ११००/-** व २ अपत्य (२ व त्यापेक्षा अधिक अपत्य) असलेल्या विधवा लाभार्थ्यांना देण्यात येणा-या दरमहा रुपये ६००/- अर्थसहाय्यात रुपये ६००/- इतकी वाढ करुन अर्थसहाय्याची रक्कम **दरमहा रुपये १२००/-** अशी करण्यात येत आहे.

६५ वर्ष व ६५ वर्षावरील दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या यादीत नाव असलेल्या निराधार व्यक्तींना केंद्र शासनाच्या इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजनेमधून ६५ ते ७९ वर्ष वयोगटातील लाभार्थ्यांना दरमहा रुपये २००/- आणि ८० वर्ष व त्यापेक्षा अधिक वयोगटातील लाभार्थ्यांना दरमहा रुपये ५००/- अर्थसहाय्य देण्यात येते. त्याला पूरक असलेल्या राज्य शासनाच्या श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेमधून लाभार्थ्यांस देण्यात येणा-या दरमहा अनुक्रमे रुपये ४०० व रुपये १००/- अर्थसहाय्यात प्रत्येकी दरमहा रुपये ४००/- इतकी वाढ करुन अर्थसहाय्याची रक्कम **दरमहा रुपये १०००/-** (६५ ते ७९ वर्ष वयोगटासाठी केंद्र शासनाचे रुपये २००/- व राज्य शासनाचे रुपये ८००/-) तर (८० वर्ष व त्यापेक्षा अधिक वयोगटाकरीता केंद्र शासनाचे रुपये ५००/- व राज्य शासनाचे रुपये ५००/-) अशी करण्यात येत आहे.

तसेच दारिद्रय रेषेखालील श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेतील अपत्य नसलेल्या विधवा लाभार्थ्यांना **दरमहा रुपये १०००/-** (केंद्र शासनाचे ६५ ते ७९ वर्ष या वयोगटासाठी रुपये २००/- व राज्य शासनाचे रुपये ८००/- तर ८० वर्ष व त्यावरील वयोगटाकरीता केंद्र शासनाचे रुपये ५००/- व राज्य शासनाचे रुपये ५००/-), १ अपत्य असलेल्या विधवा लाभार्थ्यांना **दरमहा रुपये ११००/-** (केंद्र शासनाचे ६५ ते ७९ वर्ष वयोगटासाठी रुपये २००/- व राज्य शासनाचे रुपये ९००/- तर ८० वर्ष व त्यावरील वयोगटाकरीता केंद्र शासनाचे रुपये ५००/- व राज्य शासनाचे रुपये ६००/-) व २ अपत्य (२ व त्यापेक्षा अधिक अपत्य) असलेल्या विधवा लाभार्थ्यांना **दरमहा रुपये १२००/-** (केंद्र शासनाचे ६५ ते ७९ वर्ष वयोगटाकरीता रुपये २००/- व राज्य शासनाचे रुपये १०००/- तर ८० वर्ष व त्यावरील वयोगटाकरीता केंद्र शासनाचे रुपये ५००/- व राज्य शासनाचे रुपये ७००/-) अशी करण्यात येत आहे.

या योजनेच्या अटी व निकष सोबतच्या <u>परिशिष्ट-२</u> प्रमाणे राहतील.

**<u>केंद्र पुरस्कृत योजना :-</u>**

**(३) इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजनाः-**

या योजनेमध्ये ग्रामीण भागाकरिता ग्राम विकास भागाने दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या सर्वेक्षणानुसार व शहरी भागासाठी नगर विकास विभागाने दारिद्रय रेषेखालील कुटुंबांच्या घेतलेल्या सर्वेक्षणानुसार फक्त दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या यादीत नाव असलेल्या ६५ वर्ष व ६५ वर्षावरील सर्व व्यक्ती पात्र होतील. सदर योजनेतील ६५ ते ७९ वर्ष वयोगटातील लाभार्थ्यांना केंद्र शासनाकडून दरमहा रु. २००/- तर ८० वर्ष व त्यावरील वयोगटाकरीता लाभार्थ्यांना दरमहा रुपये ५००/- अर्थसहाय्य देण्यात येते. याच लाभार्थ्यांना राज्य शासनाच्या श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेमधून देण्यात येणा-या अनुक्रमे रु.४००/- व रुपये १००/- अर्थसहाय्यात प्रत्येकी रुपये ४००/- इतकी वाढ करुन अर्थसहाय्याची रक्कम दरमहा **रुपये १०००/-** (६५ ते ७९ वर्ष वयोगटासाठी केंद्र शासनाचे रुपये २००/- व राज्य शासनाचे रुपये ८००/-तर ८० वर्ष व त्यावरील वयोगटाकरीता केंद्र शासनाचे रुपये ५००/- व राज्य शासनाचे रुपये ५००/-) अशी करण्यात येत आहे.

तसेच दारिद्रय रेषेखालील इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजनेतील अपत्य नसलेल्या विधवा लाभार्थ्यांना **दरमहा**

रुपये १०००/- (केंद्र शासनाचे ६५ ते ७९ वर्ष वयोगटासाठी रुपये २००/- व राज्य शासनाचे रुपये ८००/- तर ८० वर्ष व त्यावरील वयोगटाकरीता केंद्र शासनाचे रुपये ५००/- व राज्य शासनाचे रुपये ५००/-), १ अपत्य असलेल्या विधवा लाभार्थ्यांना **दरमहा रुपये ११००/-** (केंद्र शासनाचे ६५ ते ७९ वर्ष वयोगटासाठी रुपये २००/- व राज्य शासनाचे रुपये ९००/- तर ८० वर्ष व त्यावरील वयोगटाकरीता केंद्र शासनाचे रुपये ५००/- व राज्य शासनाचे रुपये ६००/-) व २ अपत्य (२ व त्यापेक्षा अधिक अपत्य) असलेल्या विधवा लाभार्थ्यांना **दरमहा रुपये १२००/-** (केंद्र शासनाचे ६५ ते ७९ वर्ष वयोगटाकरीता रुपये २००/- व राज्य शासनाचे रुपये १०००/- तर ८० वर्ष व त्यावरील वयोगटाकरीता केंद्र शासनाचे रुपये ५००/- व राज्य शासनाचे रुपये ७००/-) अशी करण्यात येत आहे.

दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या यादीत नाव असलेले संजय गांधी निराधार अनुदान योजनेमधील लाभार्थी ६५ वर्षाचे झाल्यानंतर त्या लाभार्थ्यांना श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजनेमध्ये या योजनांच्या निकषांच्या अधिन राहून लाभ देण्यात यावा.

त्याचप्रमाणे इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजना या दोन्ही योजनेतील लाभार्थ्यांचे वय ८० वर्ष झाल्यास त्या लाभार्थ्यांना इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजनेचा लाभ देण्यात यावा.

या योजनेच्या अटी व निकष सोबतच्या परिशिष्ट-३ प्रमाणे राहतील.

**(४) इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना:-**

दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या यादीत नाव असलेल्या ४० ते ७९ वर्ष वयोगटातील विधवा महिला, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजनेतंर्गत निवृत्तीवेतन मिळण्यास पात्र आहेत. इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजनेमध्ये केंद्र शासनाकडून लाभार्थ्याला रुपये ३००/- दरमहा देण्यात येतात. त्याला पूरक असलेल्या राज्य शासनाच्या संजय गांधी निराधार अनुदान योजनेमधून लाभार्थ्यांस देण्यात येणा-या दरमहा रुपये ३००/- अर्थसहाय्यात रुपये ४००/- इतकी वाढ करुन अर्थसहाय्याची रक्कम **दरमहा रुपये १०००/-** (केंद्र शासनाचे रुपये ३००/- व राज्य शासनाचे रुपये ७००/-) अशी करण्यात येत आहे.

तसेच इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजनेतील अपत्य नसलेल्या विधवा लाभार्थ्यांना दरमहा रुपये १०००/-(केंद्र शासनाचे रुपये ३००/- व राज्य शासनाचे रुपये ७००/-), १ अपत्य असलेल्या विधवा लाभार्थ्यांना **दरमहा रुपये ११००/-** (केंद्र शासनाचे रुपये ३००/- व राज्य शासनाचे रुपये ८००/-) व २ अपत्य ( २ व त्यापेक्षा अधिक अपत्य) असलेल्या विधवा लाभार्थ्यांना **दरमहा रुपये १२००/-** (केंद्र शासनाचे रुपये ३००/- व राज्य शारानाचे रुपये ९००/-) अशी करण्यात येत आहे.

या योजनेच्या अटी व शर्ती केंद्र शासनाच्या कार्यालयीन ज्ञापन क्रमांक जे - ११०१२ / १ / २००९ एनएसएपी, दि. ३०.९.२००९ नुसार राहतील. सदर अटी / शर्ती संक्षिप्तपणे सोबतच्या परिशिष्ट-४ मध्ये दर्शविल्या आहेत.

**(५) इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजना:-**

दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या यादीत नाव असलेल्या अपंग लाभार्थ्यांपैकी, फक्त १८ ते ७९ वर्ष वयोगटातील व ८० टक्क्याहून जास्त अपंगत्व असलेले तसेच एक किंवा बहुअपंगत्व असलेले (दोन किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व) लाभार्थी इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजनेमध्ये निवृत्तीवेतन मिळण्यास पात्र राहतील. इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजनेमध्ये केंद्रशासनाकडून लाभार्थ्यांना दरमहा रुपये ३००/- अर्थसहाय्य देण्यात येते. त्याला पूरक असलेल्या राज्य शासनाच्या संजय गांधी निराधार अनुदान योजनेमधून लाभार्थ्यांस देण्यात येणा-या दरमहा रुपये ३००/- अर्थसहाय्यात रुपये ४००/- इतकी वाढ करुन अर्थसहाय्याची रक्कम **दरमहा रुपये १०००/-** (केंद्र शासनाचे रुपये ३००/- व राज्य शासनाचे रुपये ७००/-) करण्यात येत आहे.

तसेच इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजनेतील अपत्य नसलेल्या विधवा लाभार्थ्यांना दरमहा रुपये १०००/-(केंद्र शासनाचे रुपये ३००/- व राज्य शासनाचे रुपये ७००/-), १ अपत्य असलेल्या विधवा लाभार्थ्यांना **दरमहा रुपये ११००/-** (केंद्र शासनाचे रुपये ३००/- व राज्य शासनाचे रुपये ८००/-) व २ अपत्य ( २ व त्यापेक्षा अधिक अपत्य) असलेल्या विधवा लाभार्थ्यांना **दरमहा रुपये १२००/-** (केंद्र शासनाचे रुपये ३००/- व राज्य शासनाचे रुपये ९००/-) अशी करण्यात येत आहे.

या योजनेच्या अटी व शर्ती केंद्र शासनाच्या कार्यालयीन ज्ञापन क्रमांक जे - ११०१२ / १ / २००९ एनएसएपी, दि. ३०.९.२००९ नुसार राहतील. सदर अटी / शर्ती संक्षिप्तपणे सोबतच्या परिशिष्ट-५ मध्ये दर्शविल्या आहेत.

संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्ती योजनांसाठी योजनेसाठी अर्ज करण्याची पध्दत, समितीचे गठन, कार्यपध्दती, समितीच्या बैठका परिशिष्ट-१, नमुना-दोन प्रमाणे राहील.

२. संजय गांधी निराधार अनुदान योजनेसाठी "ज्या व्यक्तीचे किंवा त्या व्यक्तीच्या कुटुंबाचे उत्पन्न, स्थावर / जंगम मालमत्तेपासून मिळणारे उत्पन्न वा सज्ञान मुलाकडून व इतर व्यक्तीकडून मिळत असलेली मदत असे सर्व एकत्रित करुन त्यांचे कायमस्वरुपी चरितार्थ चालविण्याकरीता पुरेसे उत्पन्न नसल्यास अशा व्यक्तीस / कुटुंबास" निराधार समजण्यात यावे.

३. संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेत एका कुटुंबात एकापेक्षा जास्त लाभार्थी असल्यास लाभार्थ्यांची स्वतंत्रपणे गणना करण्यात येऊन अर्थसहाय्याचे वाटप करण्यात यावे.

* ४. संजय गांधी निराधार अनुदान योजनेअंतर्गत लाभार्थ्यांची मुले २५ वर्षाची होईपर्यंत किंवा नोकरी मिळेपर्यंत (शासकीय/निमशासकीय/खाजगी) यामध्ये जे अगोदर घडेल तोपर्यंत लाभार्थ्यांना लाभ देण्यात यावा. मुलाला नोकरी मिळाल्यानंतर (शासकीय/निमशासकीय /खाजगी) मुलाचे व कुटुंबाचे उत्पन्न विचारात घेऊन लाभार्थ्यांची पात्रता ठरविण्यात यावी.

* ही अट रद्द करणेत आली आहे.

मात्र ज्या लाभार्थ्यांना फक्त मुलीच असतील अशा लाभार्थ्यांच्या बाबतीत मुलीचे वय २५ वर्ष झाले अथवा त्यांना नोकरी लागली किंवा त्यांचे लग्न होऊन त्या सासरी गेल्या तरीसुध्दा लाभ चालू राहील.

५. विशेष सहाय्य योजनेसाठी लाभार्थ्यांकडून जातीचे प्रमाणपत्राची सक्ती न करता विहित प्रपत्रातील स्वयंघोषणापत्र घेण्यात यावे. सदरचे स्वयंघोषणापत्र इतर शासकीय / खाजगी कामासाठी ग्राह्य धरण्यात येऊ नये. स्वयंघोषणापत्राचा विहित प्रपत्र सोबतच्या परिशिष्ट-१ नमुना नऊ मध्ये दर्शविला आहे.

६. संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनांकरीता दिव्यांग लाभार्थ्यांसाठी वार्षिक कौटुंबिक उत्पन्न मर्यादा रु. ५०,०००/- असून दिव्यांग लाभार्थी वगळून इतर सर्व लाभार्थ्यांसाठी वार्षिक कौटुंबिक उत्पन्न मर्यादा रु.२१,०००/- अशी राहील.

७. विशेष सहाय्य योजनेमधील लाभार्थ्यांना अर्थसहाय्याचे वितरण दर महिन्याच्या १ तारखेलाच नियमितपणे करण्यात यावे.

८. विशेष सहाय्य योजनेसाठी पात्र नवीन लाभार्थ्यांकरिता आधार कार्ड सक्तीचे राहील. तसेच विशेष सहाय्य योजनेमधील सध्याच्या लाभार्थ्यांचे आधार कार्ड संबंधित योजनेशी ३ महिन्याच्या आत संलग्न करण्याचे बंधनकारक राहील. नवीन पात्र लाभार्थ्यांचे आधार कार्ड योजनेशी संलग्न केल्यानंतरच तसेच सध्याच्या लाभार्थ्यांचे ३ महिन्यांनतर आधार कार्ड योजनेशी संलग्न केल्यानंतरच अर्थसहाय्याचे वाटप करण्यात यावे.

९. सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी दिनांक ०१ सप्टेंबर, २०१९ पासून करण्यात यावी.

१०. या योजनांखालील लाभार्थ्यांची संख्या, देय अर्थसहाय्याचे व खर्चाचे मासिक अहवाल परिशिष्ट-१२, परिशिष्ट-१३, परिशिष्ट-१४, परिशिष्ट-१५ मधील नमुना - एक मध्ये तहसिलदार यांनी जिल्हाधिकाऱ्यांना सादर करावेत आणि परिशिष्ट-१२, परिशिष्ट-१३, परिशिष्ट-१४, परिशिष्ट-१५ मधील नमुना - दोन, नमुना-तीन मध्ये जिल्हाधिकारी / विभागीय आयुक्त यांनी त्रैमासिक / वार्षिक अहवाल शासनास सादर करण्याची दक्षता घ्यावी. तसेच सध्या लाभ मिळणाऱ्या लाभार्थ्यांना अर्थसहाय्य नियमितपणे विहित कालमर्यादेत देण्यात यावे.

११. हा शासन निर्णय, नियोजन विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक ११६/१४१३, दिनांक ११.०७.२०१९ व वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक ४१८/व्यय-१४, दिनांक २४.०७.२०१९ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक २०१९०८२११२१२४६९९२२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANJAY GIRIDHAR PATIL

Digitally signed by SANJAY GIRIDHAR PATIL
DN: c=IN, st=Maharashtra,
[illegible]
street=MANTRALAYA MUMBAI,
[illegible] ou=SOCIAL JUSTICE DEPT,
o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SANJAY GIRIDHAR PATIL
Date: 2019.08.21 12:28:06 +05'30'

(सं. गि. पाटील)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

वाहतूक खाते, मध्यवर्ती कार्यालय, वाहतूक भवन, डॉ. आनंदराव नायर मार्ग, मुंबई- ४००००८

दूरध्वनी क्र.०२२-२३०२३१००. e mail: gmtraffic@msrtc.gov.in

क्र.राप/वाह/सवलत/ ५८३१ दिनांक:-२२/१२/२०२३

परिपत्रक क्र. ९५/२०२३.

प्रति,

उपमहाव्यवस्थापक, नियंत्रण समिती क्र. १/२/३

मुख्य अभियंता [सं.व.वि.]
मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी- पुणे

विभाग नियंत्रक,
रा.प.मुंबई/पालघर/रायगड(पेण)/रत्नागिरी/सिंधुदुर्ग/ठाणे/नाशिक/धुळे/जळगांव/अहमदनगर/पुणे/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/अमरावती/उस्मानाबाद/परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/ वर्धा/ गडचिरोली/ अकोला / यवतमाळ/ बुलडाणा विभाग.

यंत्र अभियंता चालन
रा.प.विभागीय कार्यशाळा, बारामती/श्रीरामपूर.

**विषय :- विविध सवलतधारी प्रवाशांना रा.प महामंडळाच्या ताफ्यातील बसेसमध्ये आसने राखीव ठेवणेबाबत.**

**संदर्भ :-** सुधारित परिपत्रक क्र.२०/२०१५, क्र.राप/वाह/सवलत/राखीव आसने/६२१८, दिनांक २६.१०.२०१५.

--------

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाद्वारे विविध सामाजिक घटकांना [ज्येष्ठ नागरिक, महिला, अधिस्विकृतीधारक पत्रकार, स्वातंत्र्य सैनिक इ.] प्रवासभाड्यात सवलत देण्यात येते. रा.प.महामंडळाच्या बसेसमध्ये सदर सामाजिक घटकांना सेवा प्रकारनिहाय उदा.[साधी, निमआराम, विनावातानुकूलित शयनआसनी, शिवशाही [आसनी], मिडी, वातानुकूलित, व्होल्वो, शिवाई, विनावातानुकूलित शयनयान,] मध्ये राखीव आसने उपलब्ध करुन दिलेली आहेत. तसेच सेवा प्रकारामध्ये विविध आसनक्षमतेच्या बसेस चालनासाठी उपलब्ध आहेत.

सद्यस्थितीमध्ये रा.प.महामंडळात नव्याने ईटीआयएम-ओआरएस कार्यप्रणाली कार्यान्वित झालेली आहे. जुन्या कार्यप्रणालीमध्ये बसेसचे वेगवेगळे सीट लेआऊट उपलब्ध आहेत. तसेच बस प्रकारानुसार विविध सामाजिक घटकांना विविध बसेसमध्ये आसन क्रमांक देखील वेगवेगळे आहेत. त्यामुळे प्रवाशांच्या अनेक तक्रारी प्राप्त होत आहेत. सदर तक्रारी निर्माण होऊ नयेत याकरीता आसन व्यवस्थेमध्ये एकसुत्रता आणण्याकरीता विविध सामाजिक घटकांचे आसन क्रमांक व सवलतधारी प्रवाशांकरीता ठेवण्यात येणा-या आसनांमध्ये बदल करणे गरजेचे होते. **आसनव्यवस्थेबाबत यापुर्वीचे सुधारित परिपत्रक क्र.२०/२०१५, क्र.राप/वाह/सवलत/राखीव आसने/६२१८, दिनांक २६.१०.२०१५ अधिक्रमित करण्यात येत आहे. तरी नवीन सुधारित बस प्रकारनिहाय आरेखन तक्ता सोबत जोडण्यात येत आहे.**

..२..

..२..

साधी,निमआराम, शिवाई, विनावातानुकूलित शयनयान व शिवशाही या प्रकारच्या बसेसमध्ये नव्याने निश्चित केलेले आसन क्रमांक व सवलतधारी प्रवाशांकरीता राखीव ठेवण्यात येणारी आसने खालीलप्रमाणे-

| अ.क्र | सामाजिक घटक | | साधी | निमआराम | शिवाई | शिवशाही | विनावातानुकूलित शयनयान. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | दिव्यांग | सद्यस्थिती | ४७,४८,४९, ५० | - | - | - | - |
| | | सुधारित | ३,४,५,६ | ३,४ | ३,४,५,६ | ३,४,५,६ | - |
| २. | विधानमंडळ सदस्य | सद्यस्थिती | १,२ | ७,८ | - | १,२ | - |
| | | सुधारित | ७,८ | ७,८ | ७,८ | ७,८ | २,३ |
| ३. | ज्येष्ठ नागरिक | सद्यस्थिती | ३,४,५ | ३,४ | - | - | - |
| | | सुधारित | ११,१२ | ११,१२ | ११,१२ | ११,१२ | ६ |
| ४. | स्वातंत्र्य सैनिक | सद्यस्थिती | ६,७ | - | - | - | - |
| | | सुधारित | १३,१४ | - | - | | - |
| ५. | महिला | सद्यस्थिती | १३,१४,१५, १६,१७,१८ | ५,६,११,१२, १३ | - | - | - |
| | | सुधारित | १९,२०,२१, २२,२९,३० | १९,२०,२१, २२,२९ | १९,२०,२१, २२,२९,३० | १९,२०, २१, २२, २९,३० | ४,५ |
| ६. | अधिस्विकृतीधारक पत्रकार | सद्यस्थिती | २५,२६ | १४,२९ | - | - | - |
| | | सुधारित | २७,२८ | २७,२८ | २७,२८ | २७,२८ | - |
| ७. | रा.प कर्मचारी | सद्यस्थिती | २३,२४ | - | - | - | - |
| | | सुधारित | ३१,३२ | - | - | - | - |

सुधारित आरेखन तक्ते सोबत जोडण्यात येत आहेत. सदरची बदल करण्यात आलेली आसन व्यवस्थेची प्रत्यक्षात अंमलबजावणी दिनांक ०१ जानेवारी २०२४ पासून करण्यात येणार आहे. तसेच रा.प.वाहनातील आसन क्रमांक बदलण्याची कार्यवाही यंत्र अभियांत्रिकी खात्यातर्फे स्टिकर्स लावून करण्यात येत असून पुर्वीचे आसन क्रमांक व सुधारित आसन क्रमांक यात तफावत असल्यामुळे प्रवासी तक्रारी उद्भवू शकतात. सबब सर्व प्रवाशांच्या माहितीकरीता नवीन आसन व्यवस्थेनुसार आरक्षणाची कार्यपध्दती अमलांत येईपर्यत सर्व बसस्थानकावर वाहन प्रकारनिहाय आसन क्रमांकांचे पुर्वीचे व नवीन सुधारणासह तक्ते सुचना फलकावर प्रदर्शित करण्यात यावेत.


मिडी बसेस, विनावातानुकूलित शयनआसनी, शिवनेरी व ई-शिवनेरी बसेस मधील सवलतधारी प्रवाशांच्या आसन क्रमांकात कोणताही बदल करण्यात येत नाही.

विविध सवलतधारी प्रवाशांद्वारे त्यांचेसाठी राखीव असलेली आसने प्रत्यक्ष प्रवासादरम्यान उपलब्ध होत नसल्याच्या तक्रारी या कार्यालयास प्राप्त होत आहेत. त्याअनुषंगाने पुढीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

१. आरक्षित बसमध्ये सवलतधारी प्रवाशांकरीता ठेवण्यात आलेली आरक्षित आसने ही आरक्षणासाठी उपलब्ध राहतील. मात्र बस सुटण्याच्या वेळेपुर्वी २४ तास सदर आसने विनासवलतधारक प्रवाशांकरीता उपलब्ध राहतील.

२. सर्व अनारक्षित बसमधील आसनांकरीता सर्व सवलतधारी प्रवाशांकरीता ठेवण्यात आलेली आरक्षित आसने ही गाडी सुटण्याच्या वेळेपर्यत सुरुवातीच्या ठिकाणी उपलब्ध राहतील. बस मार्गस्थ झाल्यानंतर सदर आसनांवर सवलतधारी प्रवाशांचा हक्क राहणार नाही.

..३..




चैतन्यनगर जेष्ठ नागरिक संघात फेस्काम चा वर्धापन दिनानिमित्त
आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात मनोगत व्यक्त करताना
मा.न्यायाधीश जिल्हा प्राधिकरण जळगाव सचिव श्री एस. पी.सय्यद साहेब.



ज्येष्ठ नागरिक संघ गोग्रासवाडी परिसर डोंबिवलीच्या
कार्यक्रमप्रसंगी मार्गदर्शन करतांना कोकण प्रादेशिक
विभागाचे अध्यक्ष श्या.गो.पाटील.



निमगाव (को) शिर्डी
येथे फेस्कॉम उपाध्यक्ष
व प्रमुख अंजुमन खान
यांना जय मल्हार
ज्येष्ठ नागरिक महिला
संघाचा संलग्नतेसाठी
प्रस्ताव देतांना
अध्यक्षा
सौ.प्रतिभाताई कातोरे
व इतर



फेस्कॉम उपाध्यक्ष व मनोयुवा कौन्सिल चे प्रमुख अंजुमन खान यांना
अहमदनगर येथे नवीन ज्येष्ठ नागरिक संघांचे प्रस्ताव देताना सर्वोत्तम क्षीरसागर,
निशिकांत क्षीरसागर, खानदेशे केशव, सुरेश उदारे, शिवाजीराव ससे, दत्तात्रय फुलसुंदर




जळगांव येथील चैतन्यनगर ज्येष्ठ नागरिक संघाचे कार्यक्रमात दिवाणी
न्यायाधीश तथा जिल्हा विधी प्राधिकरणाचे सचिव मा. एस.पी.सय्यद
यांचा सत्कार करतांना ॲड. अरूण धांडे. सोबत जगतराव पाटील,
बी.एन.पाटील, डी.टी.चौधरी, ॲड. सौ.मुंदडा मॅडम.





समन्वय समिती डोंबिवली आणि रोटरी क्लब यांच्या
संयुक्त विद्यमाने आयोजित वैद्यकीय शिबिरात सहभागी डॉक्टर्स




मुंबई प्रादेशिक विभागाच्या
द्वैवार्षिक अधिवेशन कार्यक्रमप्रसंगी
उपस्थित मान्यवर.

निमगाव (को) शिर्डी येथे फेस्कॉम उपाध्यक्ष
व प्रमुख श्री.अंजुमन खान यांना जय मल्हार ज्येष्ठ
नागरिक संघाचा संलग्नतेसाठी प्रस्ताव देतांना
अध्यक्ष शिवाजीराव कातोरे आणि सचिव दिलीप कुलकर्णी



Periodical Registered with Registrar of Newspaper for India (RNI) No. MAHMAR/2003/10732
Postal Licence Reg. No. : SGL/133/2021-2023



ज्येष्ठ महिला व वासूंबे ग्रामपंचायत सदस्या सौ.मंजुषा साळे यांना 'स्त्री प्रतिष्ठा समाज सेविका' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सोबत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौ.तृप्ती धोडमिसे व इतर.



दै.पुण्यनगरीच्या 'दिपावली विशेषांक २०२३' अंकाचे प्रकाशन समयी फेस्कॉम उपाध्यक्ष अंजुमन खान, सुरज भगत, सुलेमान मुजावर, मुनाफ मालगावे, प्रा.आशिष मुळे, अशोक मुळे, रावसाहेब चव्हाण, मुबारक खान, आयुबखान जमादार.



विश्रामबाग (सांगली) येथील क्रांतिसिंह ज्येष्ठ नागरिक संघाने दिवाळीनिमित्त मेघालय विद्यार्थी वसतीगृह, वृध्दाश्रम व चैतन्य वृध्दाश्रम, पाठक वृध्दाश्रम येथील विद्यार्थी व ज्येष्ठ यांना दिवाळी किट, भाऊबीज पाकिट देवून शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी विद्यार्थ्यांसमवेत फोटो.



साहित्यिक मोहन तोडकर लिखीत 'पाचू' कथासंग्रहाचे प्रकाशन प्रसंगी फेस्कॉम उपाध्यक्ष अंजुमन खान, निवृत्त तहसीलदार विलास डुबल, मा.डॉ.सुरेश उपळावीकर, मा.बजरंग (भाऊ) पाटील, मा.विक्रम (भाऊ) पाटील, मोहन तोडकर, सरपंच व इतर



परळी येथील महेश ज्येष्ठ नागरिक संघातील कार्यकर्त्यांचा कार्यक्रमप्रसंगीचा फोटो

कृपया अंक पत्त्यावर द्यावा. वितरीत न झालेस सकारण परत करावा.
अपूर्ण पत्ता ☐ /मयत ☐ /पत्ता सोडून गेले ☐ /पोस्टमन बीट क्र. ☐

प्रेषक :
श्री. अंजुमन खान
फेस्कॉम उपाध्यक्ष व प्रमुख, फेस्कॉम मनोयुवा कौन्सिल
अ/७, सुभाषनगर, ता. मिरज, जि. सांगली - ४१६ ४३७.
मोबा. ९४२२५८३००४

**PRINTED MATTER**

प्रति,
______________________
______________________
______________________